महाराष्ट्र शासन
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**दालन क्र. ४३२ (ॲनेक्स), ४ था मजला,**
**हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा मार्ग मंत्रालय, मुंबई ४०००३२.**
**दरपत्रके मागविण्याबबत सूचना**
**दुरध्वनी क्रमांक ०२२-२२०२८१६३**

**निविदा क्र. इएसटी२०२४/(१५७/२४)/प्रशा-१** **दिनांक- १० जुलै,२०२५**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई येथे कंत्राटी तत्त्वावर गट-ड संवर्गातील "शिपाई" या पदावर काम करण्यासाठी एकूण ४ कर्मचा-यांची आवश्यकता आहे. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.२२.२.२०१९ मधील व दि. ०७.०५.२०२१ मधील तरतूदीमध्ये नमूद केल्याप्रमाणे नोंदणीकृत सेवा संस्था/ पुरवठादार यांच्याकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.कामाचे स्वरुप, वय, अर्हता, अनुभव, अटी व शर्ती याबाबतचा माहिती/तपशील सोबत जोडण्यात येत आहे.

इच्छुक सेवा संस्थानी त्यांची दरपत्रके , आवश्यक त्या अर्हता व अनुभवाच्या प्रमाणत्रासह ही सूचना प्रसिध्द झाल्याचा दिनांकापासून ७ दिवसांच्या आत सादर करावेत. अटींची पूर्तता न करणारे/ होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पदांची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

वै. र. डुंबरे

( वैभव डुंबरे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

D:\प्रशा-1-23\कंत्राटी कर्मचारी\बाह्ययंत्रणेमार्फत- शिपाई.docx

सर्वसाधारण नियम, अटी व शर्ती

१. ११ महिने या कालावधीकरीता करार करावा लागेल. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल

२. निविदारांकडून त्यांची दरपत्रके दिनांक १६ जुलै,२०२५ सायं ६.०० वाजेपर्यत माहोदबंद लिफाप्यात प्रधान सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे नावे पाठविण्यात यावीत. त्यानंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.

३. मोहोरबंद लिफाप्यावर "शिपाई पुरवठा करणेबाबतचे दरपत्रक" असे लिहिणे आवश्यक आहे. या लिफाप्यामध्ये तांत्रिक निविदा मोहोरबंद करुन (Sealed Envelope) दरपत्रक सादर करावे अन्यथा दरपत्रक ग्राह धरण्यात येणार नाही.

४. दरपत्रक फॉर्म्सवर, दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

५. प्राप्त दरपत्रक दिनांक १७ जुलै,२०२५ रोजी प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता उघउण्यात येतील. दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडते वेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

६. निविदा स्वीकृत होऊन पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर व करार केल्यानंतर मागणी करण्यात येणारे शिपाई शालेय शिक्षण व क्रीडा विभाग येथे तात्काळ स्वीकृत दरपत्रकनुसार करणे पुरवठारावर बंधनकारक राहील.

७. शिपाई पुरवठा केल्यानंतर दरमहा मुद्रांक पावतीसहीत देयके सादर करावीत. देयकाची रक्कम ECS द्वारे जमा करण्यासाठी बॅक खात्याचा सविस्तर तपशिल सादर करणे आवश्यक राहील. परिपूर्ण देयके सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. तसेच प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

८. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, निविदा प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा तसेच दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

९. पुरवठादार संस्था नोदणीकृत (उद्योग आधरधारक किंवा उद्योग नोंणी प्रमाणपत्र धारक) असावा

१०. पुरवठादार संस्थेचा स्वत:चा वस्तू सेवा कर नोंदणी क्रमांक (GST) आवश्यक राहील.

११. वरील पुर्तता न झाल्यास पुरवठादार योग्य त्या कार्यवाहीस पात्र असेल व त्यास काळया यादीत (Blak List) टाकले जाईल.

१२. शिपाई गैरहजर अथवा रजेवार असल्यास पर्यायी शिपाई देण्याची जबाबदारी पुरवठादार यांची राहील.

१३. शनिवार, रविवार अथवा इतर शासकीय सुट्टीच्या दिवशी आवश्यकतेनुसार शिपाई उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पुरवठादार यांची राहील.

१४. यापूर्वी पुरवठादार संस्थेबाबत कोणतीही तक्रार नसावी.

१५. संस्थेचा संपर्क कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी क्र व ई-मेल इ. तपशिल देण्यात यावा.

१६. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन दिनांक १३.०७.२०२२ नुसार कंत्राटी कर्मचारी यांचा विमा संबंधित कंत्राटदार यांनी उतरविणे बंधनकारक राहील.

१७. शिपायांची कामाची वेळ सकाळी ९.३० ते संध्याकाळी ६.३० राहील परंतु शासकीय अधिकाऱ्यांच्या कामाच्या आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त उमेदवारास काम करणे आवश्यक राहील.

<u>शिपाई पदासाठी पुढील अर्हता असणे आवश्यक आहे</u> :-

१. उमेदवार भारताचा नागरीक असावा व त्यास मराठी भाषा बोलता, लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे.

२. उमेदवाराचे वय १८ ते ४५ वर्षाच्या दरम्यान असावे.

३. उमेदवाराने किमान माध्यमिक शाळा प्रमाणप्रत्र परीक्षा (S. S.C.) उत्तीर्ण केलेली असावी.

४. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

१८. कंत्राटदाराने एकूण प्रदान केलेले वेतन, सेवाशुल्क व अन्य करांसहीत देयक खालील कागदपत्रे सोबत जोडून संबंधित विभागास/कार्यालयास सादर करणे आवश्यक असेल:-

१.एकत्रित देयक

२नाव व पदनामासह कर्मचाऱ्यांना वेतन व वैधानिक देण्यांसह तपशिल

३. उपस्थितीबाबतचा तपशील

१९. कंत्राटदारामार्फत उपरोक्त यादीप्रमाणे सादर करण्यात आलेली सर्व कागदपपत्रे/पुरावे तपासून कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात येईल.

२० उपरोक्त अटी व शर्ती व्यातिरिक्त अन्य आवश्यक अटी व शर्ती, करार करतेवेळी अंतर्भूत करण्याचा अधिकार विभागाकडे असेल.

२१. उपरोक्त अटी वशर्ती मान्य असल्याचे तांत्रिक निविदा दरपत्रक मध्ये नमुद असेल, तसेच निविदाकाराच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.